डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच् डी.
संचालक

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२० – २५६९७३४१
०२०–२५६२२६८८/८९
मोबाईल : ९८८१९०८०२०
०२० – २५६२२६९२

रासेयो/२०२०–२१/२१३ दि. ०९/०४/२०२१

**प्रति,**
**मा. प्राचार्य व**
**रासेयो कार्यक्रम अधिकारी**
**रासेयो संलग्नित व स्वायत्त महाविद्यालये व परिसंस्था,**
**पुणे, अहमदनगर व नाशिक**

**विषय : कोविड–१९ लसीकरण महोत्सव आयोजित करणेबाबत**

महोदय/महोदया,

सहायक कार्यक्रम सल्लागार, युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, नवी दिल्ली यांनी पाठवलेल्या पत्रानुसार व माननीय पंतप्रधान महोदय यांनी केलेल्या आवाहनानुसार दि. ११/०४/२०२१ (महात्मा जोतिबा फुले जन्मदिवस) ते १४/०४/२०२१ (डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मदिवस) या कालावधीमध्ये **'कोविड–१९ लसीकरण महोत्सव'** साजरा करण्याचे निश्चित केले आहे.

यामध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना संलग्नित पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्ह्यातील महाविद्यालयांमधील स्वयंसेवकांमार्फत 'कोविड–१९ लसीकरण महोत्सवा' अंतर्गत समाजामध्ये जनजागृती व नागरिकांना लसीकरण करण्यासाठी प्रवृत्त करण्याचे अभियान राबविण्यात यावे. तसेच ज्येष्ठ नागरिकांमध्ये लसीकरणाबाबत असलेले गैरसमज दूर करून लसीकरणाचे फायदे व त्याबाबतची माहिती देण्यात यावी.

**'कोविड–१९ लसीकरण महोत्सवात'** रासेयो स्वयंसेवक, कार्यक्रम अधिकारी व एककांनी राबवलेल्या उपक्रमांचा संक्षिप्त अहवाल व छायाचित्रे दि. १५ एप्रिल २०२१ पर्यंत रासेयो कार्यालयास पुढील नमुन्यामध्ये **'कोविड–१९ लसीकरण महोत्सव–२०२१'** या विषयासह nss_student_list@pun.unipune.ac.in या मेल आयडीवर पाठवण्यात यावा. कळावे, ही विनंती.

| महाविद्यालयाचे नाव व रासेयो क्रमांक | दिनांक | सहभागी विद्यार्थी | | लाभार्थी | |
|---|---|---|---|---|---|
| | | मुले | मुली | महिला | पुरूष |
| | | | | | |

**संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना**